# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**माहिती तंत्रज्ञान मंत्री** : राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. जयंत पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगांव येथे दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास प्रवासी वाहतूक करणा-या जीपला भरधाव टेम्पोने धडक दिल्याने नऊ जणांचा जागीच मृत्यू होणे व सात जण गंभीर जखमी होणे, सदर अपघाताची सखोल चौकशी होण्याची आवश्यकता, तसेच अपघातात मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्याची गरज, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. मोहन मते, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात प्रसूतिसाठी दाखल करण्यात आलेल्या एका २६ वर्षीय महिलेचा प्रसूतीनंतर अतिरक्तस्राव झाल्याने मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना दि. १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी घडली असणे, डोंबिवली मोठागाव परिसरातील महिलेला प्रसूतीसाठी पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात दाखल करण्यात आले असणे, दि. १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी तिचे सीझर करण्यात आले असणे, त्यांनतर तिला सामान्य वॉर्डमध्ये स्थलांतर करण्यात येणे, मात्र तिला होणारा रक्तस्राव कमी होत नसल्याने तिची प्रकृती ढासळणे, परिणामी तिचा रक्तदाब कमी होऊ लागल्याने खासगी डॉक्टरांना तातडीने पाचारण करण्यात येणे, डॉक्टरांनी या महिलेचा

जीव वाचविण्यासाठी तिचे गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया केली असणे, त्यानंतरही या महिलेचा मृत्यू झाला असणे, सदरहू महिलेवर चुकीचे उपचार केल्यानेच तिचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबियांनी केला असणे आणि शास्त्रीनगर रुग्णालयात ठिय्या आंदोलन केले असणे, मयत महिलेच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या डॉक्टरांना अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा घेतल्याने तब्बल ४० तास या रुग्णालयात तणाव निर्माण झाला असणे, यास्तव सदरहू प्रकरणी तातडीने सखोल चौकशी करून दोषी वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, नरेंद्र भोंडेकर, संजय मेश्राम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भंडारालगत कोका वन्यजीव अभयारण्याच्या बफर झोनपासून १ कि.मी. अंतरावर असलेल्या कवलेवाडा येथील जंगलात सरपण गोळा करण्यासाठी गेलेल्या महिलेवर दिनांक २९ जानेवार २०२५ रोजी वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना घडणे, गेल्या पाच दिवसात ही दुसरी घटना असल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरून नागरिकांनी वनविभागाच्या विरोधात चक्काजाम आंदोलन करणे, कोका अभयारण्याच्या कोअर बिटात सोडलेला आणि नंतर दोन माणसांचा बळी घेऊन नरभक्षी ठरण्याच्या मार्गावर असलेल्या बीटी-१० मादीच्या अडीच वर्षीय नर वाघाला कोका जंगलात सोडण्यासाठी नागरिकांनी विरोध केला असतांना सुध्दा त्या वाघाला कोका जंगलात सोडण्यात येणे, वाघाच्या हल्ल्यात नागरिकांचा बळी जात असल्यामुळे भंडाराचे लोकप्रतिनिधीसह वनपरिक्षेत्र अधिकारी पवनी यांनी दिनांक ७/९/२०२२ व १९/०७/२०२३ रोजी उपवनसंरक्षक वनविभाग भंडारा यांना पत्र लिहून गंडेगाव, सावरला, चन्नेवाडा, कन्हाळागाव, घानोरी, सिरसाळा, वायगाव, भुयार क्षेत्रातील जंगलालगत गावे असून नागरिकांच्या संरक्षणासाठी जंगलालगत गावांसाठी चैनलिंग फेन्सींग, जिपीएस पॉलिगानची मागणी करणे, मात्र या कामास अद्यापही मंजूरी देण्यात आलेली नसल्यामुळे नागरिकात पसरलेला तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) सर्वश्री. काशिनाथ दाते, मंगेश चव्हाण, डॉ. आशिषराव देशमुख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यामध्ये विविध जिल्ह्यांमध्ये शेती लगतच्या वसाहतींमध्ये व शहरांमध्येही बिबट्यांचा वावर व दहशत असल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्रात सद्यस्थितीत बिबट्यांची संख्या ४८०० असल्याची नोंद वन विभागाकडे असणे, विशेषत: अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात ऊसशेती भागात मानवी वस्तीत बिबट्याचा वावर असणे हे नित्याचीच बाब झालेली असणे, खडकवाडी (ता. पारनेर) येथे एका इयत्ता तिसरीतील नऊ वर्षीय विद्यार्थिनीचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाल्याचे

दि.१६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, निमगाव टेंभी (ता. संगमनेर) येथे एक महिलाही बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडल्याची घटना माहे सप्टेंबर २०२४ मध्ये वा त्या दरम्यान घडणे, एकट्या आहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांनी हजारो पशुधनाची शिकार केलेली असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणे, अलीकडे ग्रामीण भागासह शहरी भागात देखील बिबट्यांचा अधिवास असल्याचे निदर्शनास येणे, या घटनांना आळा घालण्यास वन विभागाला आलेले अपयश व होणारे दुर्लक्ष, त्यामुळे राज्यातील नागरिकांमध्ये विशेषतः ऊसशेती शेतकऱ्यांमध्ये पसरलेले भीतीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने बिबट्याच्या बंदोबस्ताबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(५) सर्वश्री. सुनिल प्रभू, काशिनाथ दाते, रोहित पवार, प्रकाश सोळंके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात विविध सरकारी महाविद्यालय व रुग्णालयामध्ये भेसळयुक्त औषधांचा पुरवठा झाल्याचा गंभीर प्रकार दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी निदर्शनास येणे, या औषधांमध्ये अपेक्षित असलेले कोणतेही घटक समाविष्ट नसून, गुणवत्ता निकषांची चाचणी केली असता त्यात आरोग्यासाठी हानीहारक अशा घटकांचा समावेश असल्याची धक्कादायक माहिती निदर्शनास येणे, सदरहू भेसळयुक्त औषधांमध्ये डायोक्लोफीनॅक, मिडीयाआझोलम, डेक्सामिथसोन, मिझोप्रोस्टॉल इत्यादी औषधांचा समावेश असल्याचे आढळून येणे, डायक्लोफिनॅकच्या ४५००, डेक्सामिथसोनच्या ५११५ तर मिडीयाआझोलमच्या १५४० गोळयांचा समावेश असून नांदेडमधील सरकारी रुग्णालयामधून सुमारे १ लाख २८ हजार रुपये किमतीच्या गोळ्या सील करण्यात येऊन सदरहू गोळ्या प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात येणे, तसेच निस्तल फार्मालेश या कंपनीच्या सुमारे १४७९३ बनावट गोळ्यांचा साठा सील करण्यात येणे, प्राप्त माहितीनुसार यातील अनेक गोळ्या या साध्या तापासाठी देण्यात येणारी औषधे नसून प्रती-जैविकांचाही यात समावेश असणे, सदरहू औषधे किती कालावधीमध्ये किती रुग्णांनी घेतली, त्याचा त्यांच्या आरोग्यावर काय परिणाम झाला याबाबतची कोणतीही माहिती शासन तथा सार्वजनिक रुग्णालयांमध्ये उपलब्ध नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येणे, एकंदरितच सदरहू औषध भेसळ प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन व सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, राजु तोडसाम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर जिल्हयातील ताडाळी औद्योगिक वसाहतीतील धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीत सन २०१३ पासून फिल्ड ऑपरेटरच काम करणाऱ्या कर्णधार अशोक शेळके या

कामगाराचा कन्व्हेअर बेल्टमध्ये दबून जागीच मृत्यू झाल्याची घटना दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी निदर्शनास येणे, दरम्यान तेथील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असणे, धोक्याच्या ठिकाणी काम करताना कंपनी व्यवस्थापनाने सुरक्षा कवच पुरवण्याची तरतूद असतांना कामगारांना सुरक्षेची साधने पुरविण्यात अलेली नसणे, त्यामुळे कामगार व मृतकाच्या कुटुबियांमध्ये सुरक्षेविषयी अनेक प्रश्न उपस्थित होणे,मृतकाच्या कुटुंबियांनी नुकसान भरपाई व आर्थिक मदतीची मागणी करीत मृतदेह उचलण्यास नकार दिल्याने कंपनीत तणावाचे वातावरण निर्माण होणे, कंपनी व्यवस्थापनातर्फे कामगारांच्या सुरक्षेबाबात कोणतीही उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, सदरहू कंपनीत काम करणाऱ्या कामगारांच्या जीवितास निर्माण झालेला गंभीर धोका, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी कामगारांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाल्याने याबाबत शासनाने मृतकाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(७) सर्वश्री. अतुल भातखळकर, मनोज जामसुतकर, चेतन तुपे, संतोष दानवे, सुधीर मुनगंटीवार, सुनिल प्रभू, अनिल पाटील, श्रीमती सुलभा खोडके, श्री.राघवेंद्र पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, योगेश सागर, मंगेश चव्हाण, हारुन खान, ज्ञानेश्वर कटके, राजु तोडसाम, अजय चौधरी, अबू आझमी, वरुण सरदेसाई वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराच्या संशयित रुग्णांची संख्या २०० पेक्षा अधिक झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये पुणे जिल्ह्यात जीबीएस रुग्णांची संख्या सर्वाधिक असून सातत्याने वाढत असणे, या आजारामुळे महिन्याभरात मुंबईत १ तर राज्यात ८ जणांचा मृत्यू झालेला असणे,मुंबईच्या नायर रुग्णालयात जीबीएस या आजाराने एका नागरिकाचा दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी इंजेक्शन उपलब्ध नसल्याने मृत्यू झालेला असणे, चंद्रपूर जिल्हयातील पोंभुर्णा तालुक्यातील चेक ठाणेवासना येथील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता ६ वीत शिकत असलेल्या विद्यार्थीनीला जीबीएसची लागण झाल्याचे निष्पन्न होऊन मागील एका महिन्यापासून ती नागपूर येथे इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयात उपचार घेत असणे, नांदेड जिल्ह्यात जीबीएसची लागण झालेल्या ६२ रुग्णांपैकी २६ रुग्णांच्या घरातील पाण्यामध्ये क्लोरीनचे प्रमाण शुन्यावर आढळून आल्याचे एनआयव्हीच्या अहवालाद्वारे निदर्शनास येणे, जीबीएस फैलाव नियंत्रित राहण्यासाठी एनव्हीआयने महापालिकांना मार्गदर्शक तत्व आणि सूचना करुनही अद्याप त्याची अमंलबजावणी करण्यात न येणे, गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजारावर नियंत्रण ठेवणेस्तव रुग्णांसाठी विशेष उपचार केंद्रे व तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, या आजाराच्या रुग्ण संख्येत वाढ होऊ नये तसेच राज्यात इतरत्र हा रोग पसरु नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून पूर्वतयारी व प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनाकडून करण्यात न आल्याने

जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस)**

**सहा : शासकीय विधेयक :**

**पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२५

**सात : सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुरेश भोळे, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, सुरेश धस, दिपक केसरकर, अनिल पाटील, प्रशांत बंब, डॉ.तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री नारायण कुचे, रमेश बोरनारे, राजकुमार बडोले, देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, प्रताप पाटील-चिखलीकर, अभिमन्यू पवार, विजय शिवतारे, धर्मराव आत्राम, प्रकाश भारसाकळे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, चैनसुख संचेती, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रकाश सुर्वे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, किशोर पाटील, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते, दौलत दरोडा, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री राजू तोडसाम, प्रकाश सोळंके, संजय गायकवाड, राजेश वानखडे, संतोष बांगर, संजय बनसोडे, किसन वानखेडे, दिलीप लांडे, सत्यजित देशमुख, विनोद अग्रवाल, चंद्रकांत सोनवणे, दिलीप वळसे-पाटील, संभाजी निलंगेकर-पाटील, संतोष दानवे, राजेश पवार, शिवाजी कर्डिले, सचिन कल्याण-शेट्टी, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, रत्नाकर गुट्टे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री प्रताप अडसड, राणाजगजितसिंह पाटील, बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, किसन कथोरे, सर्वश्रीमती मोनिका राजळे, सीमाताई हिरे, देवयानी फरांदे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, संजय केळकर, हरिश पिंपळे, उमेश यावलकर, सुमित वानखेडे, श्रीमती श्रीजया चव्हाण, सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, सर्वश्रीमती सई डहाके, स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री योगेश सागर, भिमराव तापकीर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, शंकर जगताप, कृष्णा खोपडे, विक्रम पाचपुते, करण देवतळे, गोपीचंद पडळकर, अमल महाडिक, राहुल आवाडे, महेश लांडगे, चरणसिंग ठाकूर, अमोल जावळे, दिलीप बोरसे, डॉ. राहुल आहेर, ॲड. राहुल ढिकले, श्री. सुभाष देशमुख, डॉ. सुरेश खाडे, डॉ. अतुल भोसले, ॲड. राहुल कुल, सर्वश्री काशिराम पावरा, समीर मेघे, समीर कुणावार, विजय रहांगडाले, किर्तीकुमार भांगडिया, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री विनोद अग्रवाल, संजय**

**पुराम, किशोर जोरगेवार, राजेश बकाने, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री श्याम खोडे, केवलराम काळे, भीमराव केराम, जितेश अंतापुरकर, सिध्दार्थ शिरोळे, अनुपभैय्या अग्रवाल, राजेश पाडवी, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री शिवाजी पाटील, संजय उपाध्याय, चंद्रकांत पाटील, सुनिल शेळके, निलेश राणे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री शरद सोनवणे, किरण सामंत, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, राजेश विटेकर, राजू कारेमोरे, शेखर निकम, सचिन पाटील, संग्राम जगताप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेऊन राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेऊन आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, “नमो शेतकरी महासन्मान निधी” योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबऊन पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)” प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळऊन देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, "मागेल त्याला शेततळे" या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतक-यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के

कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतक-यांना सिंचनासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना" जाहिर केली असणे, या शासनाने "मागेल त्याला सौरकृषी पंप योजना" सुरु केली असल्याने शेतक-यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतक-यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरीता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतक-यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मंजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सूत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणे, 'नारीशक्ती दुत ॲप' हे क्रांतिकारी ॲप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजू महिलांना

ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघूर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) मुंबईसह ठाणे, नवी मुंबई आणि सोलापूर, नाशिक जिल्ह्यात विशेष मोहीम राबऊन ४३ बांगलादेशी घुसखोरांना अटक केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, तसेच अवघ्या पाचशे ते दोन हजार रुपयात भारतीय ओळखपत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रे बनवत असल्याचेही निदर्शनास येणे, त्यामध्ये अटक केल्यानंतर त्यांना मायदेशी पाठवण्याच्या प्रक्रियेला अनेक वर्षे लागत असणे, त्यामुळे बांगलादेशी घुसखोरांच्या प्रवेशावर संपूर्ण आळा घालण्यासाठी ठोस कारवाई करण्याची गरज असणे, त्यामुळे घुसखोरीला आळा घालण्यासाठी राज्यात विशेष यंत्रणा तैनात करण्याबाबत तसेच अटक केलेल्या बांगलादेशींना लवकरात

लवकर मायदेशी पाठवण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"गुहागर (जि. रत्नागिरी) येथील खरे-ढेरे-भोसले महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील प्रथम वर्षाचा प्रवेश, त्यांची हजेरी, त्यांच्या परीक्षा सारे काही बोगस दाखऊन त्यांना मुंबई विद्यापीठाकडून थेट तिसऱ्या वर्षाचे पदवी प्रमाणपत्र दिले जात असल्याचा आणि यातून करोडो रूपयांचा गैरव्यवहार सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या दरम्यान निदर्शनास येणे, महाविद्यालयात चालणारी अशा प्रकारची बेकायदेशीर व नियमबाहय कामे करण्यास नकार दिला म्हणून दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी संस्था चालकांनी ३ प्राध्यापकांना मारहाण करणे, त्यात तिघेही गंभीर जखमी होणे, कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करून सदर महाविद्यालयातून आतापर्यंत शेकडो विदयार्थ्यांना अशाप्रकारे थेट पदवी प्रमाणपत्र देण्यात आल्याची बाब समोर आलेली असणे, सदर प्रकार उघडकीस आल्यानंतर संस्था चालकांना वाचविण्याचे धक्कादायक प्रयत्न सुरु असणे, या घोटाळ्यामध्ये मुंबई विद्यापीठाच्या काही अधिकारी व कर्मचारी यांचाही सहभाग असण्याची शक्यता असून या प्रकरणाचा उलगडा करुन दोषींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ०३ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा